नि.फौ.ख.क्रं.४६/२०२०
सरकार वि. योगीराज वगैरे.
**नि.क्रं.३१.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की–

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | रंजीत जगदिश सव्वालाखे, |
| वय सुमारे | : | ३३ वर्षे, व्यवसाय: तलाठी, |
| निवासस्थान | : | पवनी, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**सरतपास – सहा. सरकारी वकील श्री. पी. एस. बुटले साहेब यांचेमार्फत–**

१. दिनांक ०९.१२.२०१९ रोजी मी तलाठी या पदावर मांगली येथे कार्यरत होतो. त्या दिवशी माझी कर्तव्य बजावण्यासाठी माननीय तहसिलदार आदेशान्वये गौण खणीज अवैध वाहतुक पथकामध्ये होतो. त्यावेळी माझ्या सोबत नायब तहसिलदार हेमंत कामत, नरसिंग मसराम तलाठी, विलास सयाम तलाठी, निलेश मेश्राम कोतवाल यांच्यासह वाही गेस्ट हॉऊसच्या परीसरात गस्तीवर असतांना एम.एच.४० ए.के.५९१९ क्रमांकाचा ट्रक आला. त्यामध्ये पाच ब्रास रेती भरलेली होती. आमचे वाहन दिसतांच ट्रक चालकाने रेती खाली केली. आम्ही ट्रक अडवीला व जप्ती पंचनामा करण्यास सुरूवात केली. तेवढ्यात राजु मेंघरे राहणार बाम्हणी हे ट्रक जवळ आले आणि त्याने चालकाला ट्रकमध्ये बसण्यास सांगुन ट्रक पळवुन नेला. त्यानंतर सदर घटनेची फिर्याद तलाठी नरसिंग मेश्राम यांनी पोलीस ठाण्याला दिली. मी आरोपी क्रं.२ व ३ यांना ओळखतो. मी आरोपी क्रं.१ ला ओळखत नाही. घटनेच्या दिवशी आरोपी क्रं.१ हा ट्रक चालक होता. त्याला दोषारोपातील छायाचीत्रावरून मी त्याला ओळखले. मी आरोपींना ओळखतो.

**सरतपास संपला.**

**उलट तपास आरोपीतर्फे वकील श्री. एस. डब्ल्यु. कावळे यांच्यामार्फत सुरू.**

२. हे म्हणणे खरे आहे की, येनोळा, मांगली, जुनोना येथे रेती घाटावर उत्खनन केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाळु नेण्यासाठी नागपूर अथवा पवनी येथील बरेच ट्रक रेतीसाठी येतात. हे म्हणणे खरे आहे की, येनोळा, मांगली येथे काही रेती घाटांचा लिलाव झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सदर रेतीघाटावरून रेती वाहुन नेण्यासाठी पावती दिली जाते. हे म्हणणे खरे नाही

की, सन २०१९ साली पवनी–निलज रोडवर बसस्थानकासमोर आमच्या कार्यालयाची चौकी होती. हे म्हणणे खरे नाही की, दिवसा त्यावेळा सदर चौकीमध्ये हजर कर्मचारी वाहनांची तपासणी करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींकडे ट्रक रॉयल्टी असतांनाही आम्ही ट्रक अडवुन ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपीचे ट्रक जास्त रेती आहे असे सांगुन आम्ही आरोपींना जास्त पैशाची मागणी केली व त्यांनी पैसे दिले नाहीत म्हणुन रेती सांडवली व त्यांच्यावर कार्यवाही केली. हे म्हणणे खरे नाही की, रेती ट्रक मालक पळुन गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरूध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**<u>फेरतपास – काही नाही</u>**.

| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
|---|---|
| Sd/– | Sd/– |
| (एस. एन. पाटील) | (एस. एन. पाटील) |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. |
| ०८/०२/२०२४ | ०८/०२/२०२४ |